City Pulse

संत गाडगेबाबांना अभिवादन

टोम्पे महाविद्यालय, चांदूरबाजार

चांदूरबाजार : स्थानिक गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चांदूरबाजार येथे राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे महाविद्यालय प्रांगणात संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके यांनी गाडगेबाबा यांच्या दशसूत्रीचा संदेश मांडला. याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र रामटेके, प्रा. मंगेश अडगोकर, प्रा. प्रफुल्ल चौधरी, प्रा. युगंधरा गुल्हाने, दिलीप राठोड, दिलीप चव्हाण तसेच अविनाश बनसोड, निखिल पांडे, स्वराज्य धुमाळे, सार्थक राऊत, ओम मोहोड, समृध्दी पेढे, समिक्षा सिरसाठ, आकांक्षा दरवाई, समिक्षा चोपडे, समिक्षा चर्जन, श्रृती चव्हाण यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

काँग्रेस कमिटी, चांदूर रेल्वे

चांदूर रेल्वे : तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीतर्फे संत गाडगेबाबा यांची जयंती डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुलात साजरी करण्यात आली. संत गाडगेबाबा यांच्या फोटोचे पूजन माजी नगराध्यक्ष प्रभाकर वाघ व प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस परिक्षित जगताप यांच्याहस्ते करण्यात आले. अंधश्रद्धा, बुवाबाजीच्या आहारी जाऊ नका. कर्ज काढून मुला मुलींचे लग्न करू नका, जातीयता पाळू नका, असे अनेक संदेश गाडगेबाबांनी जनतेला दिल्याचे प्रभाकर वाघ यांनी सांगितले. यावेळी जि.प. माजी अध्यक्ष नितीन गोंडाने, माजी नगराध्यक्ष शिट्टू सूर्यवंशी, तालुका अध्यक्ष अमोल होले, शहराध्यक्ष श्रीनिवास सूर्यवंशी, देवानंद खुणे, हर्षल वाघ, सतीश देशमुख, सारंग देशमुख, पंकज मेश्राम, सुमेध सरदार, शामराव सिरसाम, रुपेश पुडके, रिंकू तिखे, अजय होटे, भूषण सरदार, सतपाल वरठे, गुड्डू वानखडे, वैभव मलवार, बंटी माकोडे, प्रफुल्ल कोकाटे, सहजाद सौदागर, कैलास दांडगे, उपस्थित होते.

शिवाजी शाळेत स्वच्छता अभियान

मोर्शी : शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद यांच्या श्रमसहभागातून शाळा परिसर स्वच्छ करून गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. क्रीडा शिक्षक अजय हिवसे व संदीप ठाकरे पुढाकारातून शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजय हिवसे,तर प्रमुख पाहुणे म्हणून नलिनी खवले, लता लांडगे, सचिन चोपडे, दिनेश सुखदेवे, अर्चना तट्टे, धनश्री कोंबे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन संदीप ठाकरे, तर आभार प्रदर्शन गोपाल कळसकर यांनी केले.

राजर्षी शाहू महाराज वाचनालय, तिवसा

तिवसा : श्री स्वामी विवेकानंद बहुद्देशीय सामाजिक संस्थेद्वारा संचालित श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयामध्ये समाज सुधारक श्री संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. आजूबाजूचा परिसर स्वच्छ करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले दादाराव डहाके यांच्या हस्ते गाडगेबाबांच्या प्रतिमेला हारार्पण करण्यात आले. गाडगे महाराज यांना अभिवादन केले. कार्यक्रमाला हेमंत निखाडे, प्रियंका डहाके, पूजा वाघ, रोशनी आवारे आकाश गोरले, अंकुश केवदे, सौरभ इंगळे,नयना वणवे, प्रिया डहाके, रामटेके आदी उपस्थित होते.

गाडगेबाबा गोरक्षण स्थळ, माहुली धांडे

दर्यापूर : प्रबोधनकार लोकसंत गाडगेबाबा यांची जयंती तालुक्यातील माहुली (धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण स्थळी साजरी करण्यात आली. गोरक्षणचे संचालक प्रा. गजानन भारसाकळे यांनी पशुपक्षी यांना पाणी व अन्न पुरवठा करणाऱ्या उपकरणांची यानिमित्ताने व्यवस्था केली. संस्थेचे सहसचिव उमेश इंगळे यांनी गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन केले. गाडगेबाबा मंडळाचे सभासद माजी प्राचार्य गोपाळ बारब्दे (आदर्श हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दर्यापूर) यांनी दिलेल्या देणगीमधून जनावरांना ही सेवा देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोसेवक श्रीकृष्ण पोटे, संतोष गवई यांनी परिश्रम घेतले.

निधन वार्ता

श्याम चिखलकर

अमरावती : श्याम अंबादास चिखलकर रा. गुरूकृपा कॉलनी अकोली मार्ग यांचे गुरूवार, २३ फेब्रुवारी २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४२ वर्षे होते. त्यांच्यावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

गंगाधर शेगोकर

अमरावती : गंगाधर नथ्थू शेगोकर रा. पार्वतीनगर क्र ३ यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार, २४ फेब्रुवारी २०२३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई, भाऊ, पुतणे व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

अंगणवाडीसेविकांचे सहाव्या दिवशीही उपोषण सुरूच

आ. प्रताप अडसड यांना दिले निवेदन

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

चांदूर रेल्वे : अल्पशा मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडीसेविकांनी वेतनवाढीसाठी आणि कायम नोकरी सामावून घेण्यासह विविध मागण्यांसाठी २० फेब्रुवारीपासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले आहे. त्याच अनुषंगाने आज चांदूर रेल्वे तालुक्यातील अंगणवाडीसेविकांनी आ. प्रताप अडसड यांना मानधन वाढीसाठी निवेदन दिले.

चांदूर रेल्वे तालुक्यातील शहरी व ग्रामीण अंगणवाडीसेविकांनी बेमुदत संप पुकारला आहे. मानधनवाढ, पोषण ट्रॅकर मराठीत करणे, नवीन मोबाईल ग्रॅज्युएटी लागू करणे, आहार इंधन अंगणवाडीचे भाडे आदी मुद्यांवर गत दोन वर्षांपासून सतत शासनाकडे पाठपुरावा करित आहोत; परंतु शासनाने मागण्या पूर्ण केल्या नाही. आजपर्यंत या संपाची दखल प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही घेतली नाही. राज्यातील दोन लाखांपेक्षा जास्त अंगणवाडीसेविकांनी संप पुकारला आहे. त्यामुळे शासनाकडे या मागण्यांच्या अनुषंगाने पाठपुरावा करावा, अशी मागणी आ. प्रताप अडसड यांच्याकडे करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते पप्पू भालेराव व राजू चौधरी यांच्यासह अंगणवाडीसेविका सुनंदा कांडलकर, जया ढोले, अरुण आठवले, सीमा बोडके, धनश्री श्रीराव, शारदा राऊत, शीला नागणे, शितल तिखे, शारदा तायडे, गुलशन कुरेशी तर मदतनीस नंदा नेवारे, रजनी शेंदरे, मंदा घाटोळ, सुनीता गिरी, वनिता चमलोटे आदी उपस्थित होते.

संत गाडगेबाबांच्या प्रेरणेने आपणही कार्य केले पाहिजे

प्रशांत ठाकरे महाराज यांचे व्याख्यान

शेंडगाव येथे विविध उपक्रमांनी गाडगेबाबांची जयंती साजरी

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी : कर्मयोगी श्री. संत गाडगेबाबा यांचे जन्मगाव शेंडगाव येथे राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी प्रशांत महाराज ठाकरे यांनी संत गाडगेबाबा यांच्या समाजाप्रतीचे योगदान, दशसूत्रीची प्रेरणा घेऊन कार्य करित राहावे, असे आवाहन केले.

डेबूजी युथ ब्रिगेड, डेबूजी युथ ब्रिगेड रणरागिनी महाराष्ट्र, जानोरकर परिवार तथा ग्रामस्थ यांच्या विद्यमाने संत कर्मयोगी गाडगेबाबा यांची १४६ वी राष्ट्रीय जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रशांत महाराज ठाकरे अकोला यांच्या व्याख्यानासह विविध उपक्रम पार पडले. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच गजानन सोळंके, उपसरपंच स्वप्निल साबळे, पोलीस पाटील ज्ञानेश्वर देवळे, प्रमोद साबळे, योगिता मालवे ,विश्वनाथ राऊत आदी उपस्थित होते. दरम्यान अंजनगाव येथील गुरुमाऊली सेंटर तथा कर्मयोगी फाउंडेशन महाराष्ट्राच्यावतीने संत गाडगे महाराज जयंतीचे औचित्य साधून गरजूंना महात्मा ज्योतिराव फुले, जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे मोफत कार्ड वाटप करण्यात आले. यावेळी शिबिराचे उद्घाटन गाडगे महाराज संस्थान अध्यक्ष प्रफुल साबळे यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच गजानन सोळंके, कर्मयोगी फाउंडेशन संस्थाध्यक्ष ललित ढेपे, गुरुमाऊली सेंटर संचालक श्रीकांत येवले यावेळी उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी दर्यापूर-अंजनगाव विनोद खेडकर, नायब तहसीलदार भगत, ग्रामपंचायत शेंडगाव सचिव राजेंद्र उगले यांनी या ठिकाणी भेट दिली. या उपक्रमाला स्वप्निल साबळे, देवेंद्र साबळे, भास्कर गव्हाळे, शिवकुमार कडू यांचे विशेष योगदान लाभले.

कांडली येथे अवतार मेहेरबाबा जन्मोत्सव आज

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

अचलपूर : अवतार मेहेरबाबांचा १२९ वा जन्मोत्सव अवतार मेहेर बाबा अध्यात्मिक केंद्र,गंगा नगर कांडली येथे शनिवार, २५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे.

सोहळ्याला शुक्रवारपासूनच प्रारंभ झाला आहे. सायंकाळी गजानन देऊळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि आरती व प्रार्थना करण्यात आली. २५ फेब्रुवारी रोजी सकाळपासूनच कार्यक्रम आयोजित आहेत. नियोजनानुसार प्रार्थना, आरती, दर्शन व प्रसाद वितरण, प्रभात फेरी व त्यानंतर अल्पोपहार सकाळच्या सत्रात होणार आहेत. त्यानंतर दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसाद आणि त्यानंतर सोहळ्याचा समारोप होणार आहे. भक्तांनी जन्मोत्सव सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

'पीएम किसान सन्मान'च्या अनुदानाचे वितरण २७ पासून

तहसीलदार शेख वसीमा मेहबूब यांची माहिती

आधार बँक खात्याशी संलग्नित करण्याचे आवाहन

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

धामणगाव रेल्वे : पी. एम. किसान योजनेच्या १३ व्या हफ्त्याचे वितरण २७ फेब्रुवारीपासून होणार असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे. योजनेचा लाभ केवळ आधार संलग्न असलेल्या बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपले बँक खाते आधारशी संलग्न करावे, असे आवाहन तहसीलदार शेख वसीमा मेहबूब यांनी केले आहे.

आधार सीडिंग प्रलंबित लाभार्थ्यांचे बँक खाते आयपीपीबीमध्ये भारतीय डाक विभागामार्फत उघडण्यात येत आहेत. प्रलंबित लाभार्थ्यांची बँक खाती आयपीपीबीमध्ये नव्याने उघडल्यावर पुढील ४८ तासांत ती आधार संलग्न होऊन सक्रीय होतील. सर्व प्रलंबित पी. एम. किसान शेतकरी लाभार्थ्यांनी आपली बँक खाती आयपीपीबीमध्ये उघडण्यात यावी. कोणताही शेतकरी लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत. जेणेकरून पीएम किसान योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकरी लाभार्थ्यांना मिळू शकेल, असे आवाहन तहसीलदार शेख वसीमा मेहबूब व निवासी नायब तहसीलदार धामणगाव रेल्वे आशिष वीर यांनी केले आहे.

दर्यापुरात खा. संजय राऊत यांच्याविरोधात आंदोलन

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

दर्यापूर : जीवघेण्या हल्ल्यासाठी खा. श्रीकांत शिंदे यांनी गुंडाला सुपारी दिल्याचा आरोप खा.संजय राऊत यांनी केला होता. त्या आरोपाच्या निषेधार्थ दर्यापूर येथे शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल अरबट यांच्या नेतृत्वात निषेध व्यक्त करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या परिवारास बदनाम करण्याचे हे कारस्थान संजय राऊत यांनी रचल्याचा आरोप यावेळी शिवसैनिकांनी केला. आंदोलनात सहसंपर्कप्रमुख रवींद्र गणोरकर, तालुकाप्रमुख महेंद्र भांडे, सुनील केने, मनोज गव्हाणे, पंजाबराव नागे, वैभव भांडे, सचिन कोरडे, अतुल सगणे, तुषार चौधरी, विलास साखरे, प्रविण डोंगरदिवे, गणेश गावंडे, विनय गावंडे, राहुल भुंबर, संजय राणे, दिपक काठोळे, गजानन चांदुरकर, दिपक कावनपुरे, नारायण गावंडे, सौरभ वायझाडे, सागर गेठे, आकाश पुंडकर, प्रतिक लाजुरकर, ज्ञानेश्वर कोकाटे, फलके, गणेश धुराटे, हेमंत उमाळे, शरद अरबट, नागेश कांबे, सागर गेठे, गोपाल काठोळे, राहूल गावंडे, बंडू कोकणे, गोकुळ चांदुरकर, अक्षय आठवले, अतुल वडाळ, दिनेश अरबट, पंकज सगणे, विनोद वानखडे, सुभाष साखरे आदी उपस्थित होते.

माध्यमिक कन्या विद्यालयात निरोप समारंभ

पुण्य नगरी / प्रतिनिधी

तळेगाव दशासर : कृषक सुधार मंडळद्वारा संचालित माध्यमिक कन्या विद्यालयात नुकताच इयत्ता १० वीचा निरोप समारंभ झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शुभांगी देशमुख, तर प्रमुख पाहुणे शिवाजीराव देशमुख (अध्यक्ष कृषक सुधार मंडळ), मोहन देशमुख, भूपेंद्र नाईकनिंबाळकर, पंकज देशमुख, आनंद देशमुख,सुमन बेले, संध्या डेहनकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका देशमुख यांनी केले. विद्यार्थिनी हर्षा चौधरी, रश्मी तेलंगे, सृष्टी पवार यांनी अनुभव व्यक्त केले. मान्यवरांनी विविध अभ्यासक्रमांविषयी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात शुभांगी देशमुख यांनी भावी आयुष्यात यशाचे शिखर गाठा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयना कावळे, तर आभार प्रदर्शन पांडे यांनी केले.

करजगाव येथे शिवजयंती साजरी

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

तिवसा : सर्व गावातील लहान मुलांनी एकत्र येऊन शिवाजी महाराजांच्या मूर्तीची मिरवणूक काढून शिवजयंती साजरी केली.

माजी जिल्हा परिषद सदस्य संजय देशमुख, गौरी संजय देशमुख करजगावातील सरपंच आशिष बांबल,अंकुश गायकवाड, राहुल अंबुलकर यांनी या जयंती कार्यक्रमाला भेट देऊन मुलांचे कौतुक केले. त्यामध्ये गावातील रुपराव वाघ,विनोद गाढवे, राजेंद्र बोकडे, दिलीप बांबल, कपील बांबल,विक्की बोकडे,अमोल वाघ,आशिष भोकरे,महेश वाघ,अंकुश बोकडे, निलेश बांबल, आदीत्य सोनटक्के, राहुल वाघ, सौरभ बोकडे,अवी बोकडे तसेच लहान मुलांमधून सोहम निशानदार, गजानन कानेरकर,हृतिक कानेरकर, आर्यन बाळस्कर,सार्थक कोंडे,नमन भोकसे, प्रथमेश कोंडे,आकांशा सोनटक्के,आयुष ठाकरे आदी उपस्थित होते.

टाटा

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.

नोंद. कार्यालय : ११वा मजला, टॉवर ए, पेनिनसुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३
शाखा : पहिला मजला, एफसी अँनेक्स बिल्डिंग, फर्ग्युसन कॉलेजच्या समोर, पुणे-४११ ००५

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

(प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ९ (१) सहवाचित नियम ८ (६) अंतर्गत)

प्रतिभूत हित (अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या नियम ८ (६) आणि ९ (१) सहवाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजाणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना समस्त जनतेला आणि विशेषत्वाने खालील कर्जदार आणि/सहकर्जदार किंवा विशेषत्वाने त्यांच्या कायदेशीर वारस/प्रतिनिधींना (कर्जदार) याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील नमूद स्थावर मालमत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल) यांच्याकडे तारण आहे, जिचा टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने ताबा घेतला आहे, ती खालील नमूद कर्जदार आणि सहकर्जदारांकडून थकीत देण्याच्या वसुलीसाठी ''जसे आहे जेथे आहे'' आणि ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आधारावर **२९-०३-२०२३** रोजी विक्री करण्यात येईल. राखीव किंमत आणि इसारा रक्कम ठेव खालील नमूद करण्यात आली आहे. याद्वारे सूचना देण्यात येते की, सदर प्रतिभूत संपदा/मालमत्ता **२९-०३-२०२३** रोजी दु. २.०० वाजता ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल. ई-लिलावामध्ये भाग घेण्यासाठी इरठेचा धनाकर्ष अंतर्भूत मोहोरबंद लिफाफा शाखेचा पत्ता **टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**, पहिला मजला, एफसी अँनेक्स बिल्डिंग, फर्ग्युसन कॉलेजच्या समोर, पुणे-४११ ००५ येथे **२८-०३-२०२३** रोजी सायं. ५.०० वा. किंवा तत्पूर्वी टीसीएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावा.

प्रतिभूत संपदा/मालमत्तेची विक्री खालील दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार ''जसे आहे जे आहे स्थिती''मध्ये करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र. आणि शाखा	कर्जदार/सहकर्जदार /कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी/ हमीदारांचे नाव	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव किंमत (रु.)	इसारा रक्कम ठेव (रु.)	ताब्याचा प्रकार
१	१०४५६६६४	श्री. पंकज श्रीकृष्ण इसाल, श्रीमती रजनी श्रीकृष्ण इसा	रु. ३२,९०,८२३/- (रुपये बत्तीस लाख नव्वद हजार आठशे तेवीस मात्र) ०२-०६-२०२१	रु. २१,२८,२४०/- (रुपये एकवीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे चाळीस मात्र)	रु. २,१२,८२४/- (रुपये दोन लाख बारा हजार आठशे चोवीस मात्र)	प्रत्यक्ष ताबा
स्थावर मालमत्तेचा तपशील : मौजे राहतगाव, परगाणे नांदगाव पेठ, तालुका आणि जिल्हा अमरावती येथील अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक सीममध्ये स्थित आणि उपनिबंधक अमरावतीच्या मर्यादिमधील, क्षेत्र सर्वेक्षण क्र. १९३/३ धारक, महसूल प्रकरण क्र. एनएपी-३४/राहतगाव-३८/२०१३-२०१४ मध्ये, ११.११.२०१३ दिनांकित आदेशाच्या अमरावतीच्या कलेक्टरच्या आदेशानुसार बिगरशेतकी वापरासाठी रूपांतरित शेतकी क्षेत्र, रूपांतरित जमीन प्लॉट क्र. २, मोजमापित ४६७८ चौ. फुटांची सर्व मालमत्ता, त्यावरील ''द बेस्ट रेसिडेन्सी'' नाव आणि शैलीची निवासी इमारत, त्यामधील ६.३२% अविभाजित हिश्शासोबत बांधीव क्षेत्रफळ ३६.७९ चौ. मीटर असलेला, पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १०४. **चतु:सीमा** :- पूर्व :- रस्ता, पश्चिम :- रस्ता, उत्तर :- अन्य ले-आऊट, दक्षिण :- रस्ता.					
२	१०४८२६७३	श्री. कपिल चंद्रभान सूर्यवंशी, श्रीमती आरती भीमराव नरवणे	रु. २६,५०,९१५/- (रुपये सव्वीस लाख पन्नास हजार नऊशे पंधरा मात्र) ०८-०५-२०२१	रु. १७,७६,९२०/- (रुपये सतरा लाख शहात्तर हजार नऊशे वीस मात्र)	रु. १,७७,६९२/- (रुपये एक लाख सत्याहत्तर हजार सहाशे ब्याण्णव मात्र)	प्रत्यक्ष ताबा
स्थावर मालमत्तेचा तपशील : मौजे राहतगाव, परगाणे नांदगाव पेठ, ता. अमरावती, जि. अमरावतीच्या अंतिम प्लॉट क्र. २, मोजमापित ४६७८ चौ. फुटांच्या सर्व्हे क्र. १९३/३ येथे स्थित ''द बेस्ट रेसिडेन्सी'' म्हणून ज्ञात योजनेमधील ५.१६% अविभाजित हिश्शासोबत, ३०.०५ चौ. मीटर्स बांधीव क्षेत्रफळाच्या, दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २०३ धारक स्थावर मालमत्तेचे सर्व अंगीकृत भाग. **चतु:सीमा** :- पूर्व :- रस्ता, पश्चिम :- रस्ता, उत्तर :- अन्य ले-आऊट, दक्षिण :- रस्ता.					
३	१०१४९१६५	श्री. प्रल्हाद प्रभाकर सावलकर, श्रीमती प्रतिभा मधुकर विरूळकर	रु. २४,८३,७०९/- (रुपये चोवीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे नऊ मात्र) ०६-०६-२०१९	रु. १९,३५,५३०/- (रुपये एकोणीस लाख पस्तीस हजार पाचशे तीस मात्र)	रु. १,९३,५५३/- (रुपये एक लाख त्र्याण्णव हजार पाचशे त्रेपन्न मात्र	प्रत्यक्ष ताबा
स्थावर मालमत्तेचा तपशील : मौजे राहतगाव, परगाणे नांदगाव पेठ, तालुका आणि जिल्हा अमरावती येथील अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक सीममध्ये स्थित आणि उपनिबंधक अमरावतीच्या मर्यादिमधील, क्षेत्र सर्वेक्षण क्र. १९३/३ धारक, महसूल प्रकरण क्र. एनएपी-३४/राहतगाव-३८/२०१३-२०१४ मध्ये, ११.११.२०१३ दिनांकित आदेशाच्या अमरावतीच्या कलेक्टरच्या आदेशानुसार बिगरशेतकी वापरासाठी रूपांतरित शेतकी क्षेत्र रूपांतरित जमीन प्लॉट क्र. २, मोजमापित ४६७८ चौ. फुटांची सर्व मालमत्ता, त्यावरील ''द बेस्ट रेसिडेन्सी'' नाव आणि शैलीची निवासी इमारत, त्यामधील ५.९६% अविभाजित हिश्शासोबत बांधीव क्षेत्रफळ ३४.६९ चौ. मीटर असलेला, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ४०३. **चतु:सीमा** :- पूर्व :- फ्लॅट क्र. १०३, पश्चिम :- फ्लॅट क्र. १०१, उत्तर :- अन्य प्लॉट, दक्षिण :- रस्ता.					
४	१०५३३८७७	श्री. अविनाश नामदेव बोरकर, श्रीमती लोपा अविनाश बोरकर	रु. २२,२६,७७७/- (रुपये बावीस लाख सव्वीस हजार सातशे सत्याहत्तर मात्र) ०२-०६-२०२१	रु. ४४,८०,०००/- (रुपये चव्वेचाळीस लाख ऐंशी हजार मात्र)	रु. ४,४८,०००/- (रुपये चार लाख अठ्ठेचाळीस हजार मात्र)	प्रतीकात्मक ताबा
स्थावर मालमत्तेचा तपशील : मौजे निंभेरा खुर्द, परगाणे बडनेरा आणि ता. व जि. अमरावती येथील त्यावरील आरसीसी संरचनेसोबत मोजमापित १६०० चौ. फूट., पूर्व-पश्चिम डिव्हिजनच्या उत्तर भागाच्या सदर प्लॉटपैकी एकूण मोजमापित ३२०० चौ. फूट, त्यामधील ले-आऊट प्लॉट क्र. १६, एसओडी अमरावतीद्वारे २८.०४.१९८२ रोजी पारित आदेश, महसूल प्रकरण क्र. एनएपी-३४/निंभेरा खुर्द २६/१९८०, १९८१ अन्वये बिगरशेतकी जमिनीमध्ये रूपांतरित क्षेत्र सर्वेक्षण क्र. ६६ धारक, अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक सीमेमधील आणि उपनिबंधक अमरावतीच्या अधिकारक्षेत्रामध्ये स्थित सर्व मालमत्ता. **चतु:सीमा** :- पूर्व :- सर्व्हिस लाइन, पश्चिम :- रस्ता, उत्तर :- प्लॉट क्र. १५, दक्षिण :- या प्लॉटचा उर्वरित भाग.					

लिलावामध्ये, जनतेला त्यांच्या बोली व्यक्तिशः सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. कर्जदार/सहकर्जदारांना याद्वारे सदर सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवसांत पुढील व्याजासोबत एकूण देणे अदा करण्यासाठी शेवटची संधी देण्यात येत आहे, कसूर केल्यास स्थावर मालमत्ता वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येईल. उपरोक्त नमूद देय रक्कम, व्याज आणि मूल्यासह (विक्रीचे मूल्य समाविष्ट) प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे जमा केल्यास किंवा त्याचे अशा प्रतिभूत कर्ज, व्याज आणि मूल्य लिलावाच्या तारखेपूर्वी जमा केल्याचे समाधान करणारा पुरावा दिल्यास, ई-लिलाव थांबविण्यात येईल.

या विक्रीच्या संबंधामध्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीमध्ये हिताच्या संपादनासाठी किंवा संपादनाचा प्रयत्न करण्यासाठी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अशा कोणत्याही प्रकारे, या विक्रीच्या संबंधात प्रस्तावाचे किंवा कोणत्याही व्यक्तीचे कोणतेही कर्तव्य नसेल.

सदर विक्री प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ मध्ये विहित अटी आणि पुढील अटींना अधीन राहील.

टीप : मालमत्तेचा ई-लिलाव पोर्टल https://bankauctions.in द्वारे/**२९-०३-२०२३** रोजी दु. २.०० वा. ते दु. ३.०० वा. दरम्यान प्रत्येकी १० मिनिटांच्या मर्यादित विस्तारासह होईल.

अटी आणि नियम : १. खालील परिशिष्टामध्ये विनिर्देशित तपशील निम्नस्वाक्षरीकाराच्या उत्तम माहितीनुसार नमूद करण्यात आला आहे; परंतु निम्नस्वाक्षरीकार सदर उद्घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, चूक किंवा वगळणुकीसाठी उत्तरदायी नसेल. बोली रक्कम किंवा बोलीदारानुसार कोणताही विवाद उद्भवल्यास, प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मताला अधीन राहून स्थावर मालमत्ता पुन्हा एकदा लिलावासाठी ठेवण्यात येईल. **२.** स्थावर मालमत्ता राखीव किमतीहून कमी किमतीला विक्री केली जाणार नाही. **३.** बोली वाढविण्याची रक्कम : **रु. १०,०००/-** (रुपये दहा हजार) असेल. **४.** मालमत्ता खरेदी करण्यासाठी सादर केलेल्या सर्व बोली ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.'' च्या नावे शाखेच्या पत्त्यावर देय धनाकर्षाद्वारे उपरोक्त नमूद इसारा रक्कम सोबत असाव्यात. अयशस्वी बोलीदारांना लिलावानंतर धनाकर्ष परत करण्यात येईल. कोणत्याही एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएसद्वारे जमा केलेल्या रकमेसाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्याला संपर्क करा. **५.** यशस्वी बोलीदार जर तो/ती बोलीसाठी कायदेशीर पात्र असेल आणि तसेच बोली रक्कम राखीव किमतीहून कमी नसेल तर उच्चतम बोलीदाराला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल. प्रस्तुत केलेली किंमत पुरेशी नाही, असे स्पष्ट होईल व ती अनुपयुक्त असेल तेव्हा उच्चतम प्रस्ताव नाकारण्याचा निर्णय प्राधिकृत अधिकारी घेईल. **६.** अभिलेखीत करणासाठी, विक्री तहकूब/खंडित करण्याचा निर्णय प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मतानुसार घेण्यात येईल. **७.** मालमत्तेचे निरीक्षण, पूर्वविळ निश्चित करून **२०-०३-२०२३** रोजी स. ११ वा. ते सायं. ५.०० वा. दरम्यान करता येईल. **८.** यशस्वी बोलीदार म्हणून घोषित झालेल्या व्यक्तीने अशा घोषणेनंतर त्वरितच खरेदी किंमत/बोली रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम २४ तासांत प्राधिकृत अधिकाऱ्याकडे जमा करावी, जी इरठे समाविष्ट असेल आणि जमा करण्यास कसूर केल्यास, मालमत्ता खाजगी संधीद्वारे नवीन लिलाव/ विक्रीसाठी पुन्हा ठेवण्यात येईल. **९.** जर का उपरोक्त अनुसार प्रारंभिक रक्कम जमा केली असल्यास, खरेदीदाराने खरेदी किमतीची देय असलेली शिल्लक रक्कम सदर विक्रीच्या पुष्टीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा तत्पूर्वी रविवार किंवा अन्य रजा आणि पंधराव्या दिवशी रजा असल्यास १५व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्याकडे जमा करावी. **१०.** उपरोक्त नमूद कालावधीदरम्यान रक्कम जमा करण्यास कसूर केल्यास मालमत्ता खाजगी संधीद्वारे नवीन लिलाव/विक्रीसाठी पुन्हा ठेवण्यात येईल. टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. द्वारे इरठे समाविष्ट जमा रक्कम जप्त करण्यात येईल आणि कसूरदार खरेदीदाराचे मालमत्तेवरील सर्व दावे निरस्त होतील. **११.** ज्याकरिता मालमत्ता उत्तरदायी आहे, त्या टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. यांना ज्ञात असलेल्या भाराचा तपशील उपरोक्त टेबल अनुसार आहे. मालमत्ता कर, वीज देयक इत्यादी संवि